SSSTS-42011(11)/346/2023-VEHICLE

/227467/2024

रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोस्ट : शिर्डी -४२३ १०९ ता.राहाता जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी : +९१ -२४२३ - २५८५०० फॅक्स : +९१ -२४२३ - २५८ ७७०, टेलीग्राम : साईनाथ, शिर्डी.

---

जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/ 3558 /२०२३.

दिनांक - 8 JAN 2024

प्रति,

प्रोप्रायटर / मॅनेजर,

..................................................

..................................................

..................................................

**विषय:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे संस्थान वाहने, विद्युत जनित्रे, लॉण्ड्री, फॉगिंग मशिन तसेच इतर विभागांना लागणारे इंधन (पेट्रोल व डिझेल) खरेदी कामी प्रचलीत दरात सुट दरपत्रक देणे बाबत..**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही एक धर्मादाय संस्था आहे. संस्थानकडील विविध प्रकारची वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन या करीता वार्षीक अंदाजे २,६४,००० लिटर डिझेल व ९,००० लिटर पेट्रोलची आवश्यकता आहे. आवश्यक इंधन (डिझेल / पेट्रोल) खरेदी करीता खालील अटी-शर्तीस अधिन राहुन प्रचलीत दरात सुट दरपत्रकांची मागणी करण्यात येत आहे.

**अटी-शर्ती :-**

१) संस्थानचे विविध विभागाकरीता आवश्यकतेनुसार इंधन ( डिझेल / पेट्रोल ) पुरवठा करणे करीता इंधन दरात प्रति लिटर किती सवलत देणार याचा दर पत्रकात स्पष्ट उल्लेख करावा.

२) इंधन खरेदीचे बिलास एक महिनेचे क्रेडीट द्यावे लागेल.

३) श्री साईबाबा संस्थान ही एक धर्मदाय संस्था असलेणे जास्तीत जास्त सवलतीचे दर देण्यात यावेत.

४) दरपत्रकातील दर मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क संस्थानने राखुन ठेवला आहे.

५) दरमहा पुरविलेल्या इंधन बिलाची रक्कम इंधन बीले प्राप्त झालेनंतर १५ दिवसात आपले बॅक खात्यात RTGS द्वारे आदा केली जाईल.

६) आपण पुरविलेले इंधन बिलासोबत दरमहा वाहन निहाय / विभाग निहाय समरी द्यावी लागेल.

७) बिलाचे मागणी पत्र दरमहा ५ तारखे पर्यत द्यावे लागेल.

८) इंधन पुरवठयाचा कार्यादेश व इंधन बिलाची रक्कम शिर्डी कार्यालयातुन अदा होणार असल्याने सदरील व्यवहाराबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता / कोपरगांव / मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्याय कक्षेत राहील.

९) आपले सिलबंद दरपत्रक **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मु.पो.शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर** या नावे दि.१८ / ०१ /२०२४ अखेर पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्याचे करावे.

Signed by
Bhikan Deochand Dabhade
Date: 05-01-2024 10:57:04
कार्यकारी अभियंता
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned with OKEN Scanner